# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.03.2025** **वारःसोमवार**

---

1. नाशिकमधील आगामी कुंभमेळ्यासाठी प्राधिकरण कायदा आणणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती
2. गटशेतीसाठी सरकार नवीन धोरण आणणार- मुख्यमंत्र्यांची घोषणा
3. नागपूरमध्ये हिंसाचारानंतर लागू केलेली संचारबंदी सहा दिवसांनी उठवली आणि
4. दिव्यांगांच्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची सुवर्ण कामगिरी

**<u>मुख्यमंत्री-सिंहस्थ कुंभमेळा-नाशिक</u>**

नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर कुंभमेळा प्राधिकरण कायदा करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिकमध्ये दिली. कुंभमेळा तयारीचा आढावा घेतल्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. देशातील बारा जोतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर विकासासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगानं त्र्यंबकेश्वर परिसराच्या धार्मिक, सामाजिक, पर्यावरणीय विकासासाठी तयार केलेल्या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यातील कामांना मंजुरी घेऊन सुरूवात करावी, असे निर्देश त्यांनी दिले. गोदावरी नदीच्या शुध्दीकरणासाठी खासगीकरणातून कामं केली जाणार आहेत; तसंच कुशावर्त तीर्थाचं पाणी शुध्द करण्यासाठी नगरपालिकेला सूचना देण्यात आल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं. दरम्यान फडणवीस यांनी काल त्र्यंबकेश्वर मंदिराला तसंच कुशावर्त तीर्थ इथं भेट देऊन पूजा केली. तसंच विविध आखाड्यांच्या साधु महंतांशीही संवाद साधला.

**<u>मुख्यमंत्री-नाशिक</u>**

विकासाची प्रक्रिया केवळ राज्याच्या एका भागापुरती मर्यादित न ठेवता राज्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिक इथं सांगितलं. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलरची करण्यासाठीचा पथदर्शी आराखडा तयार असून हे उद्दिष्ट 2029मध्येच साध्य होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, अर्थात सीआयआय यंग इंडियन्सच्या नाशिक शाखेतर्फे, पश्चिम क्षेत्र परिषदेनं आयोजित केलेल्या संवादात ते बोलत होते. देशातील सर्वांत मोठ्या, वाढवण बंदरासाठी नाशिकहून ग्रीन फिल्ड रोड तयार करण्यात येणार आहे. त्याचा मोठा फायदा नाशिकला मिळेल, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

**<u>मुख्यमंत्री-पाणी फाऊंडेशन-पुणे</u>**

गटशेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणता येणं शक्य आहे, त्यामुळं राज्य सरकार गटशेतीसाठी लवकरच नवीन धोरण आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केली. गट शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरणाचा तसंच आधुनिक शेती पद्धतीचा वापर करता येतो; त्यामुळे भविष्यात गट शेती शिवाय पर्याय नाही, असंही ते म्हणाले. बालेवाडीच्या शिवछत्रपती क्रिडासंकुलात आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप 2024च्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक,

अभिनेते आमीर खान, किरण राव, सत्यजित भटकळ आदी यावेळी उपस्थित होते. शाश्वत शेतीसाठी जलसंधारणाचं महत्त्व अधोरेखित करताना फडणवीस म्हणाले....

***खरं तर ही सुरुवात जी काही पाणी कपच्या माध्यमातून झाली आपल्याला कल्पना आहे, की महाराष्ट्रामध्ये दोन हजार पंधरा सालापासून आपण पाण्याचं जन आंदोलन उभं केलं. जलयुक्त शिवार सारखी योजना सुरू केली कारण आपल्याला या गोष्टीची कल्पना होती, की महाराष्ट्रामध्ये जर शेती शाश्वत करायची असेल तर जोवर आपली गावं जलसमृद्ध होत नाही जलपरिपूर्ण होत नाही जोपर्यंत ते वॉटर बजेटिंग वॉटर अकाउंटिंग करणार नाही आणि पाण्याचं शास्त्र शिकणार नाही जोपर्यंत लोकसहभाग त्याच्यातला वाढणार नाही तोपर्यंत महाराष्ट्र हा दुष्काळीच राहील कारण बावन्न टक्के महाराष्ट्र असा आहे की ज्या ठिकाणी पाऊस कमी पडतो तो अवर्षण प्रवण अशा प्रकारचा महाराष्ट्र आहे आणि म्हणून जलसंधारणातनच आपण हे परिवर्तन करू शकतो***

**गृहनिर्माण संस्था-मुख्यमंत्री-पुणे**

राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महाअधिवेशन तसंच प्रदर्शनाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक बाळासाहेब अनासकर, महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन आदी उपस्थित होते.

**शहिद दिन**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांचं बलिदान देणारे वीर क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना काल देशभरात आदरांजली अर्पण करण्यात आली. 23 मार्च 1931 या दिवशी या तिघांना लाहोरच्या मध्यवर्ती तुरुंगात फाशी देण्यात आली होती. हा दिवस देशभर शहीद दिन म्हणून पाळला जातो. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकच्या शासकीय विश्रामगृहात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**नागपूर**

नागपूरमधील महाल भागात गेल्या आठवड्यात झालेल्या हिंसाचारानंतर लागू करण्यात आलेली संचारबंदी सहा दिवसांनंतर काल दुपारी तीन वाजता पूर्णपणे उठवण्यात आली. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी काल हे आदेश जारी केले. संचारबंदी उठवल्यानंतर पोलिसांनी रुट मार्च केलं आणि लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहनही केलं. परिस्थिती नियंत्रणात असून, पोलिस बंदोबस्त चोख आहे असं रवींद्र सिंघल यांनी सांगितलं. संचारबंदी उठवल्यानंतर आता नागपूरमधील जनजीवन पूर्वपदावर येत आहे.

**आनंदाची बस**

राज्यातल्या अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याच्या काही गावात राज्य परिवहन महामंडळाने पहिल्यांदाच बस फेऱ्या सुरू केल्या आहेत. ही बससेवा या भागातील नागरिकांसाठी 'आनंदाची बस' ठरली आहे. ऐकुया अधिक वृत्तांत.....

***अविकसित, अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त जिल्हा अशी असलेली गडचिरोली जिल्ह्याची ओळख पुसून, या जिल्ह्याला विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी राज्य सरकार सातत्यानं प्रयत्न करत आहे. धानोरा तालुक्यातील***

***मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी या गावांसाठी राज्य परिवहन महामंडळाने बस फेऱ्या सुरू कराव्यात अशी मागणी इथल्या गावकऱ्यांनी केली होती; त्यानंतर मुख्यमंत्री आणि गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार आता या गावांमध्ये एसटी बसच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत. या बसमुळे गावातील आदिवासी बांधवांची मोठी सोय झाली आहे. त्यांना तालुक्याच्या ठिकाणी कार्यालयीन कामासाठी, दवाखान्यासाठी जाणं सोयीचं झालं आहे. बसमधून दररोज साधारण अडीचशे ते तीनशे नागरिक प्रवास करत आहेत. गडचिरोली जिल्हा आता विकासाच्या मार्गावर धावणार असल्याचं 'आनंदाची ही बस' दाखवून देत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी प्राची गावस्कर पुणे***

**अजित पवार-नांदेड**

लाडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, आर्थिक ताळमेळ साधून लाडक्या बहिणींना 21शे रुपये देण्यात येतील, असा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी केला. ते काल नांदेडमध्ये एका कार्यक्रमात बोलत होते. राज्याची तिजोरी रिकामी झाली आहे, हा विरोधकांचा प्रचार खोटा असल्याचं सांगत राज्याचा सात लाख कोटींचा अर्थसंकल्प विधानसभेत मांडल्याचंही त्यांनी सांगितलं. मराठवाड्याच्या विकासासाठी महायुती सरकार कटीबद्ध असल्याचं ते म्हणाले. दरम्यान, नायगाव तालुक्यातील नरसी इथं झालेल्या एका कार्यक्रमात काँग्रेसमधून भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्यासह अनेक नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

**दादाभुसे-नाशिक**

शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावं यासाठी सीबीएसई मंडळाच्या धर्तीवर अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत; मात्र, याबाबत अनेक गैरसमज निर्माण झाले आहेत. ते दूर केले जातील, येत्या दोन दिवसांत विधानसभेत त्याची संपूर्ण माहिती दिली जाईल, असं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी काल नाशिक इथं माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं. या अभ्यासक्रमाचं सर्वत्र स्वागतच होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यामुळं बालभारती किंवा राज्य मंडळाचं अस्तित्व संपणार नाही, असंही भुसे यांनी स्पष्ट केलं. यंदाच्या वर्षी पहिलीसाठी हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून तीन वर्षांत 12वीपर्यंत त्याचा विस्तार केला जाईल, त्याचं नियोजन सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**खेलो इंडिया**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत सलग तिसरा दिवस महाराष्ट्रासाठी सुवर्णमय ठरला. तीरंदाजीमध्ये मुंबईच्या आदिल अन्सारीने सुवर्ण पदकाला गवसणी घातली. लातूरच्या सागर कातळेने मिश्र 10 मीटर एअर रायफल प्रोन एसएच 1 प्रकारात सुवर्णपदकाचा वेध घेतला. नाशिकच्या दिलीप गावित याने पुरुषांच्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-47 या प्रकारातून सुवर्णपदक पटकावलं. कोल्हापूरचा साईवर्धन पाटील, कराडचा साहिल सय्यद, चैतन्य पाठक यांनी रौप्य पदक मिळवलं. तर तीरंदाजीमध्ये यवतमाळच्या राजश्री राठोडने, भारोत्तोलनात कोल्हापूरच्या शुक्ला बीडकर, सोनम पाटील यांनीही रौप्य पदकं पटकावली.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.